दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
• वर्ष १६ वे • अंक २६१ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.१६ डिसेंबर २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

# पनवेल महापालिका क्षेत्रातील शाळांची घंटा वाजली ; पुष्पवृष्टी करुन विद्यार्थ्यांचे केले स्वागत

## विद्यार्थी, पालकांसह शिक्षकांमध्येही उत्साहाचे वातावरण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राज्य शासनाच्या आदेशानुसार पनवेल महापालिका क्षेत्रात गेल्या काही दिवसांपासून बंद असलेल्या शाळा आजपासून (बुधवार दि.१५ डिसेंबर) सुरू करण्यात आल्या आहेत. शहरी भागातील पहिली ली ते सातवीचे वर्ग असलेल्या सर्व माध्यमांच्या व व्यवस्थापनांच्या सर्व शाळा सुरक्षितपणे सुरू करण्याच्या मार्गदर्शक सूचना आयुक्त गणेश देशमुख यांनी दिल्या असून त्याप्रमाणे बुधवारपासून महापालिका क्षेत्रातील शाळा सुरू झाल्या आहेत. तसेच महापालिकेच्याही अकरा शाळा आजपासून सुरू झाल्या आहेत.



शाळेच्या पहिल्याच दिवशी आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, शिक्षणाधिकारी बाबासाहेब चिमणे यांनी पनवेल महापालिकेच्या छोटा खांदा, कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लीश मिडीयम स्कूल या शाळांना भेटी देऊन गुलाब पुष्प, चॉकलेटस्, शैक्षणिक साहित्य देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले. तसेच शाळांची पाहणी करून शिक्षकांना आवश्यक सूचनाही दिल्या.

लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कुल अँड ज्युनिअर कॉलेज कामोठे येथे बुधवारी सकाळी आयुक्त गणेश देशमुख यांनी भेट देऊन पाहणी केली. शाळांमध्ये सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून वर्गखोल्या, स्टाफरूम, प्रयोगशाळा, संगणक कक्ष, शाळेच्या तसेच परिसराची साफसफाई करून सॅनिटायझेशनही करण्यात आले आहे. खबरदारीच्या अनुषंगाने पालिकेच्या माध्यमातून शाळांमध्ये विविध उपाययोजना आणि नियोजन करण्यात आले आहे. तसेच शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांवर शिक्षकांकडून पुष्पवृष्टी करून त्यांचे गुलाबपुष्प देऊन स्वागतही करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान पाहायला मिळाले.

यावेळी सीबीएससी बोर्डच्या मुख्याध्यापिका अर्चना खाडे, स्टेट बोर्डच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे, रयत शिक्षण संस्थेचे रायगड जिल्हा पीअ–रओ बाळासाहेब कारंडे, सौ.शकुंतला रामशेठ ठाकूर विद्यालय उलवे मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांच्यासह आदी उपस्थित होते.

कोविड महामारीमुळे मार्च २०२० पासून सुमारे पावणेदोन वर्षे शाळा बंद होत्या. या काळात शाळांचे ऑनलाईनपद्धतीने शिक्षण सुरू होते. असे असले तरी विद्यार्थ्यांच्या सर्वींगीण विकासासाठी शाळा सुरू होणे गरजेचे होते. याबाबत राज्याच्या शिक्षण विभागाने पहिली ते सातवीपर्यंतच्या शाळा सुरू करण्याबाबतचा निर्णय घेतला होता. त्यानूसार आजपासून पहिली ते सातवी पर्यंतच्या शाळा पनवेल महापालिका क्षेत्रात सुरू झाल्या असून या शाळांनी आवश्यक ती सर्व खबरदारी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. याच पार्श्वभूमीवर आयुक्त गणेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, शिक्षणाधिकारी बाबासाहेब चिमणे यांनी पालिका क्षेत्रातील विविध शाळांना भेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत केले तसेच तेथील तयारीची माहिती घेऊन आवश्यक त्या सूचनाही केल्या.

# अपुऱ्या डिझेल कोट्यामुळे मच्छीमार संकटात

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण : राज्यातील मच्छीमारांसाठी चार महिन्यांसाठी ३० टक्के डिझेल कोटाच देण्यात आला आहे.यामुळे मच्छीमारांना एका बोटीसाठी फक्त एक महिन्यांपर्यंत पुरेल इतकेच डिझेल कोटा उपलब्ध होणार आहे. मत्स्यव्यवसाय विभागाच्या या आततायी निर्णयामुळे डिझेलअभावी मात्र मच्छीमारांवर मासेमारी व्यवसाय बंद करुन बोटी धक्क्याला बांधून ठेवण्याचा एकमेव पर्याय उरला असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया मच्छीमारांकडून व्यक्त होऊ लागल्या आहेत.**

राज्यातील मच्छीमारांना मासेमारी बोटींसाठी मत्स्यव्यवसाय विभागाच्या आयुक्त कार्यालयातुन डिझेल कोट्याचे वाटप केले जाते. त्यानुसार मत्स्यव्यवसाय विभागाच्या आयुक्त कार्यालयाने एक डिसेंबर २०२१ ते मार्च २०२१ दरम्यानच्या चार महिन्यांच्या कालावधीसाठी मच्छीमारांना ४० टक्के डिझेल कोटा मंजूर करण्यात आला होता.मात्र मच्छीमारांना ४० ऐवजी फक्त ३० टक्केच डिझेलचे वितरण केले जात आहे.मात्र चार महिन्यांसाठी वितरण करण्यात येणारा ३० टक्के डिझेल कोटा मच्छीमारांसाठी पुरेसा नाही. कारण खोल समुद्रातील एका ट्रिपच्या मासेमारीसाठी १५ दिवसांचा कालावधी लागतो.त्यामुळे एक ट्रिपसाठी साधारणपणे ३५०० हजार लिटर डिझेल लागते.त्यामुळे वितरण करण्यात येत असलेला ३० टक्के मंजुर डिझेल कोटा डिसेंबर अखेरपर्यंतच संपुष्टात येणार आहे.त्यामुळे डिझेल अभावी मात्र मच्छीमारांवर मासेमारी व्यवसाय बंद करुन बोटी धक्क्याला बांधून ठेवण्याचा एकमेव पर्याय उरला असल्याची तक्रार करंजा मच्छीमार संस्थेचे अध्यक्ष भालचंद्र कोळी यांनी राज्याचे मत्स्यव्यवसाय मंत्री अस्लम शेख यांच्याकडे केली आहे.

याआधीच बाजारात डिझेलचे भाव गगनाला भिडले आहेत.समुद्रात मासळीचा दुष्काळ आहे.मासळी मिळालीच तरी मासळीला योग्य तो भाव मिळेल याची खात्री नाही. कोरोनाच्या दोन वर्षांच्या कालावधी दरम्यान मासेमारी व्यवसाय मोठ्या प्रमाणावर विपरीत परिणाम झाला आहे.त्याशिवाय अचानक उद्भवणाऱ्या अनेक नैसर्गिक आपत्तींमुळे मच्छीमारांना बोटी बंद ठेवून नांगरुन ठेवण्याची वेळ येते.अशा विविध संकटात मासेमारी कशी करावी असा प्रश्न मच्छीमारांना पडतो.मात्र अशा अनेक संकटांचा मच्छीमारांना धैर्याने सामना करावा लागत आहे.त्यात आता नव्याने अपुऱ्या पुरवठा करण्यात येणाऱ्या डिझेल कोट्याची भर पडली आहे.त्यामुळे डिझेलअभावी मात्र मच्छीमारांवर मासेमारी व्यवसाय बंद करुन बोटी धक्क्याला बांधून ठेवण्याची वेळ येऊन ठेपली असल्याने मच्छीमार चिंतेत पडले आहेत.

# सराईत गुन्हेगारास अटक ; १ लाख ३१ हजारांचे दागिने जप्त

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरात हातचलाखीने चोऱ्या करून पिशवी किंवा पर्समधील दागिने सराईतपणे लंपास करणाऱ्या एका चोरट्यास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेऊन त्याच्याकडून जवळपास १ लाख ३१ हजारांचे सोन्याचे दागिने हस्तगत केले.

शहरातील झवेरी बाजार पनवेल ते कृष्णाळे तलाव परिसरात एक महिला खरेदी करीत असताना आरोपी बाळू गोवर्धन पवार (वय–२५) याने व त्याच्या साथीदाराने गर्दीचा फायदा घेऊन सदर महिलेच्या पर्समधील सोन्याचे दागिने चोरून नेले. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करताच वपोनि विजय कादबाने, पोनि (गुन्हे) संजय जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि गणेश दळवी, पोहवा नितीन वाघमारे, पोहवा अविनाश गंथडे, पोना अशोक राठोड, पोना महेश पाटील, पोना भगवान साळुंके, पोशि संतोष मिसाळ आदींच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे या आरोपीचा माग काढून बीड जिल्ह्यातील गेवराई येथे दोन दिवस थांबून सापळा रचून सदर आरोपीस गजाआड केले आहे व त्याच्याकडून दोन गुन्हे मिळून जवळपास १ लाख ३१ हजारांचे सोन्याचे दागिने हस्तगत केले आहेत. या कामगिरीबद्दल परिमंडळ–२ चे पोलिस उपायुक्त शिवराज पाटील यांनी वपोनि विजय कादबाने सह त्यांच्या गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अभिनंदन केले आहे.

## संक्षिप्त...

### आर्यन खानला हायकोर्टाकडून मोठा दिलासा

**दै.रायगड नगरी । मुंबई**

ड्रग्ज प्रकरणात शाहरुख खानचा मुलगा आर्यन खानला मोठा दिलासा मिळाला आहे. जामीन मंजूर झाल्यानंतर आर्यनला दर शुक्रवारी एनसीबीच्या कार्यालयात हजेरी लावण्याचे आदेश दिले होते. पण, आता हे आदेश मागे घेण्यात आले आहेत.

त्यामुळे आता आर्यन आता खानला दर शुक्रवारी एनसीबी कार्यालयात हजेरी लावण्याची गरज नाही. या संदर्भात आर्यन खानने न्यायालयात याचिका दाखल केली होती. याचिकेच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने हे आदेश दिले.

ड्रग्ज प्रकरणी मुंबई उच्च न्यायालयाने आर्यन खानला मोठा दिलासा दिला आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या नव्या निर्दे शांनुसार आर्यन खानला यापुढे दर आठवड्याला मुंबई एनसीबी कार्यालयात हजेरी लावावी लागणार नाही. क्रूझ ड्रग्ज प्रकरणाचा तपास आता दिल्ली एनसीबीकडे आहे. कोर्टाच्या निर्देशानुसार आर्यनला चौकशी आणि तपासासाठी आवश्यक असल्यास त्याला ७२ तास अगोदर नोटीस देऊन बोल–ावता येईल.

१० डिसेंबर रोजी आर्यन खानने मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती आणि क्रूझमधून ड्रग्ज जप्त केल्याप्रकरणी जामिनाच्या संबंधित अटींमध्ये सुधारणा करण्याची विनंती केली होती. आर्यनच्या अर्जात त्याला दर शुक्रवारी एनसीबीच्या दक्षिण मुंबई कार्यालयात हजर राहावे लागेल या अटीतून सूट मागितली आहे. या अर्जात म्हटले आहे की, तपास आता दिल्ली एनसीबीच्या विशेष तपास पथकाकडे सोपवण्यात आला असल्याने त्याची मुंबई कार्यालयात हजर राहण्याची अट शिथिल केली जाऊ शकते.

# कैलास पायगुडे मनगटावर घड्याळ बांधणार की शिवबंधन? याकडे सर्वांचे लक्ष



**दै.रायगड नगरी । संजय रिकामे**

**तळा** : भाजपा तालुका अध्यक्ष कैलास पायगुडे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर नव्या पक्षातील प्रवेशाबाबत मनगटावर घड्याळ बांधणार की शिवबंधन याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राजीनामा दिल्यानंतर पायगुडे यांची शिवसेना उपनेते म्हाडा सभापती विनोद घोसाळकर यांनी भेट घेऊन चर्चा केल्याने ते शिवसेनेत जाणार याची चर्चा रंगली आहे. घोसाळकर यांच्या आधी कैलास पायगुडे हे आ.अनिकेत तटकरे यांनाही भेटले आणि राष्ट्रवादीतील प्रवेशाचा मुहूर्तही ठरल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे पायगुडे आपल्या मनगटावर घड्याळ की शिवबंधन बांधणार याकडे लक्ष लागले आहे. उद्योजक असलेले पायगुडे गेली ६ वर्षापासून भाजपा सोबत आहेत. या काळात त्यांच्या पत्नी सौ. ज्योती पायगुडे गिरणे ग्रामपंचातीच्या सरपंच झाल्या. त्या आधी २०१७ च्या

.../२

# नवीन वर्ष, ख्रिसमस, थर्टी फर्स्टच्या पार्ट्यांवर कोणत्याही निर्बंध नसणार : ना.राजेश टोपे

**जालना : वृत्तसंस्था**

राज्यात करोना व्हायरसच्या ओमिक्रॉन व्हेरियंटचे रुग्ण वाढत आहे. मुंबई, पुणेबरोबरच विदर्भ, मराठवाड्यातही ओमिक्रॉनचे रुग्ण आढळत आहेत. ओमिक्रॉनच्या रुग्णांची वाढती संख्या पाहता राज्यात पुन्हा कठोर निर्बंध लावणार का?, अशी चर्चा आहे. तसंच, नाताळ व नववर्षाच्या पार्श्वभूमीवर राज्यात पुन्हा निर्बंध कठोर होण्याची शक्यता असतानाच. आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी महत्त्वाची माहिती दिली आहे..



राज्यातील ओमिक्रॉन रुग्णांची संख्या २८वर गेली आहे. उस्मानाबाद, बुलडाण्यातही रुग्ण आढळले आहेत. त्या पार्श्वभूमीवर राज्यात पुन्हा निर्बंधाची चर्चा होत आहे. त्यावर आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. नवीन वर्ष, ख्रिसमस, थर्टी फर्स्टच्या पार्ट्यांवर कोणत्याही निर्बंध नसणार, असं राजेश टोपेंनी स्पष्ट केलं आहे. तसंच, नागरिकांनी फक्त करोनाचे नियम पाळावे व गर्दी टाळावी, असं आवाहन केलं आहे.

आपल्याला कोणत्याही परिस्थितीत करोना नियम पाळावे लागणार आहेत. लसीकरण वाढवावं लागणार असून या पार्श्वभूमीवर आपल्याला काळजी घ्यायची गरज आहे. राज्यात ओमिक्रॉन रुग्णांची संख्या वाढत असतील तर याचा परिणाम फेब्रुवारीमध्ये पाहायला मिळू शकतो असा टास्क फोर्सचा अंदाज आहे, अशी भिती त्यांनी व्यक्त केली आहे. त्यामुळं राज्यात निर्बंध लावायचा कोणताही विचार नाही पण काळजी घ्या, असं राजेश टोपेंनी स्पष्ट केलं आहे.

दरम्यान, आरटीपीसीआर चाचण्यांचे खासगी प्रयोगशाळेचे दर आजपासून कमी करण्यात आले असून आधी विमानतळ, रेल्वे स्टेशनवर चाचणीसाठी ४ हजार ५०० रुपये दर आधी करण्यात आला होता. त्याचा दर आता १ हजार ९७५ ठेवण्यात आला आहे. थरमोफिशरचा देखील १ हजार ९७५ ठेवण्यात आला आहे. टाटाचा दर ९७९ रुपये करण्यात आले असून पिपीई किट्स उपलब्ध झाल्यास हे दर भविष्यात आणखी कमी करण्यात येतील, अशी माहिती देखील टोपे यांनी दिली.

सक्तीच्या लसीकरणा विरोधात औरंगाबाद खंडपीठात शिक्षकांनी केली याचिका दाखल केली आहे. यावर देखील टोपे यांनी भाष्य केलं. लसीकरण हा एच्छिक विषय आहे तो सक्तीचा नाही. मात्र चांगल्या हेतूनेच ठिकठिकाणचे जिल्हाधिकारी त्यांची सक्ती

.../२

# आरक्षणांबाबत केंद्र सरकारने नेहमीच नकारात्मक भूमिका घेतली : अशोक चव्हाण

**दै.रायगड नगरी । मुंबई**

आरक्षणांबाबत केंद्र सरकारने नेहमीच नकारात्मक भूमिका घेतली असून, त्यामुळेच मराठाआरक्षणापाठोपाठ ओबीसींच्या राजकीय आरक्षणालाही धक्का लागल्याची टीका सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण यांनी केली आहे. ओबीसी आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या निकालावर प्रतिक्रिया व्यक्त करताना ते बोलत होते. अशोक चव्हाण म्हणाले की, सर्वोच्च न्यायालयाचा आजचा निर्णय निराशाजनक आहे. ओबीसी समाजाला न्याय मिळेल, अशी आशा आम्हाला होती. परंतु दुर्दैवाने केंद्र सरकारने हे आरक्षण टिकवण्यासाठी सहकार्याची व सकारात्मक भूमिका घेतली नाही. केंद्राची हीच नकारात्मक भूमिका मराठा आरक्षण प्रकरणामध्येही दिसून आली होती. केंद्र सरकार इम्पिरिकल डेटा द्यायला तयार नाही, आरक्षणाची ५० टक्के मर्यादा शिथील करायला तयार नाही, राज्यांना सहकार्य करण्याची त्यांची मानसिकता नाही, यातून केंद्र सरकारला आरक्षणे टिकवायची आहेत की नाही, अशी शंका निर्माण होते, असा आरोप त्यांनी केला. विविध सामाजिक आरक्षणांच्या अनुषंगाने आम्ही वेळोवेळी केंद्र सरकारकडे अनेक मागण्या मांडल्या. मात्र केंद्राने



एकदाही मदतीचा हात पुढे केला नाही. संसदेच्या पावसाळी अधिवेशनात ५० टक्के आरक्षणाची मर्यादा शिथील केली असती तर आज मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लागला असता, ओबीसी आरक्षणाच्या अडचणी कमी झाल्या असत्या, मुस्लिम समाजाला आरक्षण देण्याची प्रक्रिया सुरू करता आली असती. पण केंद्राने कधीही अनुकूल भूमिका घेतली नाही, असे अशोक चव्हाण यांनी सांगितले.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ओबीसी आरक्षणासह होऊ

.../२

# डंपरच्या धडकेत महिलेचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

डंपरने दिलेल्या धडकेत ४१ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची घटना शिवनसई येथे येथे घडली आहे. गुलाब (लता) गणेश तांबोळी असे मृत महिलेचे नाव आहे.

डंपर क्रमांक एमएच ०५ डीके २७२७ वरील चालक दगडू चंदर हिलम हा दुंदरे गावातून पनवेल बाजूस येत होता. यावेळी रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून हयगईने त्याने वाहन चालवले. आणि गुलाब गणेश तांबोळी यांना ठोकर मारली. यात गुलाब तांबोळी यांचे दोन्ही पाय व कंबरेचे हाड फ्रॅक्चर झाले. व त्यांचा हॉस्पिटलमध्ये मृत्यू झाला. याप्रकरणी चालकाविरोधात पन–वेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न मार्गी

## आ. बाळाराम पाटील यांच्या प्रयत्नाला यश

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोकण विभाग शिक्षक आमदार बाळाराम पाटील यांनी मुंबई उपसंचालक कार्यालयाला भेट दिली. सदर भेटी दरम्यान संचालक टेमकर सर, संचालक महेश पालकर आणि मुंबई उपसंचालक संगवे सर यांच्याशी शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रश्नांबाबत चर्चा केली. बराच काळ लोटूनही अनेक प्रश्न अद्याप मार्गी का लावले गेले नाहीत? याबाबत आमदार बाळाराम पाटील यांनी संबंधित अधिकाऱ्यांना विचारणा केली.



अर्धवेळ, पूर्णवेळ काम करणाऱ्या शिक्षकांच्या वैयक्तिक मान्यता देणे, शालार्थ आय डी ची प्रकरणे त्वरित निकाली काढणे, प्रलंबित सातवा वेतन आयोग थकबाकी हफ्ता, अश्या प्रलंबित प्रश्नांवर यावेळी सकारात्मक चर्चा झाली. लवकरच सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन यावेळी अधिकाऱ्यांनी दिले.

तशेच २०% अनुदान निधी प्राप्त झालेल्या कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वैयक्तिक मान्यता – शालार्थ आय. डी. नसल्याचे

.../२

# माथेरानमध्ये राष्ट्रवादीचे जनसंपर्क अभियान

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानमध्ये मागील काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सक्रिय झाली असून पक्षातील पदाधिकाऱ्यांचे खांदे पालट होताच पक्षाला एक नवी उभारी आली असून रायगड जिल्हा सरचिटणीस अजय सावंत यांच्या नेतृत्वाखाली नवीन शहराध्यक्ष श्री राजेश दळवी यांच्या समवेत अनेक कार्यकर्त्यांनी येथील शहरामध्ये जनसंपर्क अभियान सुरू केले असून घरोघरी जाऊन पक्षाची ध्येय धोरणे सांगून पक्ष बलकटिकडे पाऊल उचलले आहे.



माथेरान नगरपालिकेवर सर्वाधिक सत्ता भोगण्याचा बहुमान राष्ट्रवादीला आहे मागील निवडणुकीमध्ये मात्र त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता पण अनेक उमेदवार हे थोड्याश्या फरकाने पराभूत झाले होत त्यावेळी अनेक कार्यकर्त्यांनी पक्षावर नाराज होऊन मतदाना-तून आपला रोष व्यक्त केला होता

पण आज हेच कार्यकर्ते सर्व विसरून पुन्हा एकदा पक्ष बांधनिस पुढाकार घेताना दिसून येत असून जनसंपर्क अभियानास मोठा प्रतिसाद लाभत आहे अनेक तरुण पक्षाकडे आकर्षित होत असून विनाशर्त पक्षाचे काम करण्यास स्वतःहून पुढे येत आहेत ह्या वेळी घरोघरी गेल्याने अनेक महिलांनीही आपल्या व्यथा बोलताना मागील चुका सुधारून ह्यावेळी पक्षाबरोबर उभे राहणार असे स्पष्ट शब्दात सांगितल.

राज्यात व माथेरान मध्ये राष्ट्रवादी सरकार असताना अनेक विकासकामे झालेली आहेत ज्यामध्ये प्रामुख्याने शून्य अनुदानातून नवीन पाणीपुरवठा योजना,येथे सध्या सुरु असलेल्या एमएमआरडीए साठी रस्त्यांना दिला गेलेला १२७ कोटी निधी माथेरान करांचे धुळवीरहीत रस्त्यांचे स्वप्न अवकाश केंद्र, कचऱ्यापासून वीज निर्मिती असे अनेक विकास कामे झालेली आहेत व त्याचे विस्मरण नागरिकांना नसल्याचे ह्यावेळी प्रकर्षाने जाणवले.

ह्या अभियानात रायगड जिल्हा सरचिटणीस अजय सावंत, शहराध्यक्ष राजेश दळवी, नगरसेविका वर्षा रोड्रिक्स महिलाअध्यक्षा स्वाती कुमार, गिरीश पवार, सीताराम कुंभार, स्नेहा चव्हाण आतिष ढेबे अष्पाक बढाने आदी कार्यकर्ते सहभागी झाले आहेत.

## जातीवरून अपमान करून केली मारहाण, गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हेदुटणे- पडघे येथील आकाश संजय खंडागळे याचा वर्गमित्र मोनीश रवींद्र घरत यांच्यासोबत दोन महिन्यापूर्वी वाद झाला होता. त्यानंतर दोघांमध्ये बोलणे बंद झाले. आकाश हा त्याची बुलेट घेऊन घरी जात असताना मोनीश ने त्याची गाडी थांबवली व गालावर चापट मारून जातीवाचक अपमान केला. व त्याच्या अंगावर मच्छीचे घाण पाणी टाकले. यावेळी मोनीशचा भाऊ विकेश घरत आणि त्याची आई काळुबाई घरत हे याठिकाणी आले. आणि आकाशला पकडून ठेवले. यावेळी मोनीश घरत याने धंद्या वरील काती (कोयदा) आणून त्याच्या डोक्यावर पाठीमागे मारले. यात आकाश खंडागळे हा जखमी झाला.

## मनसे पनवेल शहरच्या वतीने रांगोळी स्पर्धेचे पारितोषिक वितरण संपन्न



**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र नवनिर्माण सेना पनवेल शहर आयोजित रांगोळी स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ नुकताच संपन्न झाला. या स्पर्धेत मोनाली तांबोळी यांनी प्रथम क्रमांक , अस्मी शेटे यांनी व्दितीय क्रमांक , मृणाल वाणी यांनी तृतीय क्रमांक तर स्नेहल राणे व श्वेता खैरे यांनी उत्तेजनार्थ क्रमांक पटकावला.

या स्पर्धेचे आयोजन पनवेल शहर मनसेचे शहर उपाध्यक्ष संदीप पाटील आणि आकाश घाटे यांनी केले होते. या प्रसंगी महिला आघाडीच्या वर्षा पाचभाई, प्रीती खानविलकर, स्वरूपा सुर्वे, मनसेचे, पनवेल विधानसभा सचिव प्रतिक वैंद्य, शहर अध्यक्ष संजय मुर्कुटे, तालुका सचिव केदार सोमण, शहर उपाध्यक्ष मंदार पाटणकर, प्रकाश लाड, सचिन सिलकर, आकाश दलाल, अक्षय जोशी, अवधुत ठाकुर, अनिमेश ओझे, अवधुत म्हामुणकर आदी उपस्थित होते. विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके प्रदान करण्यात आली.


### जाहीर नोटीस

आमचे अशिलांचे वतीने तमाम जनतेस या नोटीसीद्वारे असे सुचित करण्यात येते की, माझे अशिल यांनी सौ.निलम शशिकांत केणी व श्री.शशिकांत नामदेव केणी यांच्या मालकीचा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पबाधितांना पुर्नवसन व पुःर्नस्थापन योजनेंतर्गत त्यांना सिडकोच्या साडेबावीस टक्के योजनेनुसार पुष्पक वडघर नोड, येथे वाटप भूखंड संचिका क्रमांक CHID-ICIG-84 नुसार सिडको वडघर पुष्पक नोड, येथील सेक्टर R3 मध्ये भूखंड क्रमांक ६९, एकूण क्षेत्र १०० चौ.मी. हा वाटप करण्यात आलेला आहे. या भूखंडाचे सर्व हक्क व अधिकार व फायदे कायमस्वरुपी आमचे अशील श्री.किशोर शिवदास गोवारी यांना त्रिपक्षीय कराराने हस्तांतरीत करण्याचे ठरविलेले आहे.

सदर मिळकती बाबत सदर मिळकतीचे मालक हे आमचे अशिलांचे सोबत भाडेपट्ट्याचे व इतर सर्व हक्क अधिकार हस्तांतरीत करणार आहेत. सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य पुरेश्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत प्रत्यक्ष येवून अथवा कार्यालयीन पत्यावर रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकती मधील त्यांचा हिस्सा निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले मालक / कब्जेदार यांच्या बरोबर विक्री व हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : १५/१२/२०२१

सही/-
प्रदीप टी. मुंडकर
ॲडव्होकेट हायकोर्ट
मु.चिंचपाडा, ता.पनवेल



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीशीने जाहीर सूचना देण्यात येते की, श्री.सतीशचंद्र केसरवानी रा.४०५, फेअर गार्डन, आझाद लेन अंधेरी (प) मुंबई ५८ यांनी फाईल नं.३१६, येथील तळोजा नोड, प्लॉट नं.३६ प्रमाणे सिडकोतर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्फे संपादीत झालेला असून सदर खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण केले आहे. वर नमूद पक्षकार कडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे पक्षकार मेसर्स अमान डेव्हलपर्स तर्फे भागीदार जुबेर इसाक ख्वाजा २) सिराजुल इस्लाम शेख राहणार : ख्वाजा हाऊस, प्लॉट नं.२३ ए, सेक्टर ३५ ई, खारघर नवी मुंबई यांनी त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक ३१६ तळोजा नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | २३ | ३६ | ४०.०० चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
ॲड.सुजाता जो. पाटील
विसावा को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट
नं.ई १२४/१३, सेक्टर १२,
खारघर, नवी मुंबई-४१०२१०
मो.नं.८७९४१६४८३



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, श्री.सतीशचंद्र केसरवानी राहणार : ४०५, फेअर गार्डन, आझाद लेन, अंधेरी (प.) मुंबई ५८ यांनी फाईल नं.७३६, येथील तळोजा नोड, प्लॉट नं.३५ प्रमाणे सिडकोतर्फे साडेबारा टक्के योजनेतर्फे संपादीत झालेला असून सदर खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण केले आहे. वर नमूद पक्षकार कडून खालील वर्णन केलेला भूखंड माझे पक्षकार मेसर्स अमान डेव्हलपर्स तर्फे भागीदार जुबेर इसाक ख्वाजा २) सिराजुल इस्लाम शेख राहणार : ख्वाजा हाऊस, प्लॉट नं.२३ ए, सेक्टर ३५ ई, खारघर, नवी मुंबई यांनी त्रिपक्षीय करारनामा हस्तांतरण करण्याचे व विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक ७३६ तळोजा नोड**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | २३ | ३५ | ४०.०० चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ. कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
ॲड.सुजाता जो. पाटील
विसावा को.ऑप.हौ.सोसायटी, प्लॉट
नं.ई १२४/१३, सेक्टर १२,
खारघर, नवी मुंबई-४१०२१०
मो.नं.८७९४१६४८३



### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेली मिळकत वनमाला घनःश्याम म्हात्रे व इतर २३ यांच्या स्वकष्टार्जित मालकी हक्क व कब्जेवहिवाटीची असून आम्ही आमचे अशिलांसोबत खालील परिशिष्ट मिळकत विक्री करणेकामी बोलणी चालू असून तत्पूर्वी कोणाची काही तक्रार, हरकत असल्यास ती समजणेकामी सदर नोटीस देणेत येते आहे.

खालील परिशिष्टात मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टातील मिळकतीचे पूर्ण पणन योग्रू हक्क व अधिकार आहे. असा भरवसा व खात्री विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाने आमचे अशिलास दिलेली आहे. तथापि, सदरील मिळकतीवर विद्यमान मालकाचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, लीन, पोटगी, अन्न, वस्त्र, कोर्टवाद, चार्ज, वाटप, दावा, वारसाहक्क, मृत्यूपत्र, वहिवाट, अदलाबदल, करार, खरेदीखत, मुखत्यापत्र, विरोधी कब्जा अगर तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध वगैरे असल्यास संबंधितांनी सदरील नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ (सात) दिवसांचे आत मुळ कागदपत्रांनिशी आमचे खालील पत्यावर येवून खात्री द्यावी. सदर मुदतीमध्ये हरकत न आल्यास खालील परिशिष्टातील मिळकत पूर्णतः निर्वेध, निजोखमी, निष्कर्जी व बोजारहीत असून विद्यमान मालकास खालील परिशिष्टात मिळकतीचे पूर्ण पणन योग्य हक्क व अधिकार आहे. कोणाचेही कोणत्याही प्रकारचा काही एक, अधिकार व हितसंबंध नाही. असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे असे समजून आमचे अशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पूर्ण करतील. मुदतबाह्य हरकत विचारात घेतली जाणर नाही.

परिशिष्ट : तुकडी रायगड, पोटतुकडी, तालुका : उरण, मे.दुय्यम निबंधक, उरण, रायगड, जिल्हा : रायगड तसेच जिल्हा परिषद रायगड, हद्दीतील गाव मौजे : पिरकोन येथील मिळकत भूमापन / सर्व्हे नं.८४, हिस्सा नं.१० यांस एकूण क्षेत्र ०० हेक्टर २२ आर ६० प्रति व पोटखराबा ०० हेक्टर ०२ आर ०० प्रति, यांस आकार रक्कम रुपये ०.७८ पैसे, यांसी चतुःसिमा वहिवाटीप्रमाणे आहेत. येणेप्रमाणे वर्णनात्मक जमीन, जोडहक्क, अधिकार व हितसंबंधासहीत दरोबस्त

रायगड
दि.१६ डिसेंबर २०२१

सही/-
श्री.विनायक ताम्हणकर, वकील
खरेदीदारातर्फे वकील
पत्ता : ३०२, जय आशापुरा रेसिडेन्सी,
शनी नगर, मांजर्ली बदलापूर (प.) ४२१५०३
भ्रमणध्वनी क्र.७४००४००२७७



### CHANGE IN NAME

My Old Name was **SHAKIRA ZAKIR HUSAIN MANIYAR** Alias **SAKIRA ALI MANIYAR** As per Affidavit in front of Adv. Prafulla V. Mhatre Notary-Panvel, I will be Known as **NIGAR ZAKIR MANIYAR** Residing at Room No.7, Nafis Apartment, Patel Mohalla, Panvel, Tal. Panvel, Dist. Raigad-410 206 (Maharashtra)

**NIGAR ZAKIR MANIYAR** (Sd/- New Name)



### PUBLIC NOTICE

NOTICE is hereby given to the public at large that my client Mrs. Rajbans Kaur has lost/misplaced the 'Original Share Certificate' of Flat No. A-404, 4th Floor, admeasuring area about- 570 Sq. ft, Builtup, in the society known as 'Trimbak' Co-Operative Housing Society Limited, Plot No. 86, Sector- 15, CBD Belapur, Navi Mumbai, Taluka- Panvel, District-Raigad, Pin- 400614, comprising of 05 fully paid-up shares each, bearing distinctive numbered from 71 to 75 (Both inclusive) of Rs. 50/- (Rupees- fifty only) each, issued by the said society under share certificate no. 15, dated-18/05/2008.

It is humbl request If any person /s found the said Share Certificate please returne it to my office address or my client's residence address given above within 14 days from the date of publication hereof, otherwise the application for duplicate share certificate have to move to the said society by my client. My office address given herein below.

Place: Navi Mumbai,
Date: 15-12-2021

SD/-
Adv. Yogendra L. Dubey
(Advocate High Court)
Office no. 06, Phenix Residency,
Plot No. 64, Sector- 20, Kharghar,
Navi Mumbai, Pin- 410210.
Mob- 9820668773



मा.पांडे साहेब

ॲड.विजयेंद्र नारायण मुंढे

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे न्यायालयात
क्रि.एम.ए.नं.८१३/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२४/०१/२०२२

कै.कृष्णा दामा पाटील
वय : ४५ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.सांगडे, पोस्ट : चिखले, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत चिखले
तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी कै.नामीबाई दगडू पाटील यांचा मृत्यू दि.१३/०७/२००० रोजी मौजे : सांगडे, पो.चिखले, तालुका : पनवेल, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला आहे. म्हणून अर्जदार यांनी या न्यायालयात सदर कै.नामीबाई दगडू पाटील यांचे मृत्यूच्या तारखेची नोंद होणेकामी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर कै.नामीबाई दगडू पाटील हे वर नमूद ठिकाणी मयत झाले आहे किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसचे तारखे पासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही, तर सदर न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१५/१२/२०२१ रोजी दिली.

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल



राव साहेब

ॲड.प्रमिला मो. ठाकूर/ पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश सो., यांचे कोर्टात
एम.ए.नं.१६७०/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१२/०१/२०२२

१) मनिबाई गंगा धनगर उर्फ बावदाने
लग्नानंतर नांव मनिबाई सोमा ढेबे
वय : ९३, धंदा : शेती
रा.सारसई, आपटा, पनवेल, जि.रायगड
२) भागीबाई गंगा धनगर उर्फ बावदाने
लग्नानंतर नाव भागाबाई कानू घाटे-मयत
१/१) कोंडू कानु घाटे
वय : ७०, धंदा : शेती
१/२) धोंडू कानू घाटे
वय : ६७, धंदा : शेती
दोघे १/१ व १/२ रा.खडई, ता.खालापूर, जि.रायगड — अर्जदार
वगैरे
कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार मनिबाई गंगा धनगर उर्फ बावदाने लग्नानंतरचे नाव मनिबाई सोमा ढेबे रा.सारसई, आपटा, पनवेल, जि.रायगड येथील रहिवाशी असून त्यांचे वडील कै.गंगा जानू धनगर उर्फ बावदाने हे दि.४/६/१९३६ रोजी तर आई कै. साईबाई गंगा धनगर उर्फ बावदाने या दि.२४/४/१९४५ रोजी मौजे येथे त्यांच्या राहत्या घरी अल्पशा आजाराने मयत झाले आहेत. तसेच त्यांची मुलगी कै.भागिबाई कानू घाटे या देखील दि.१४/०८/२००५ रोजी मौजे : खडई, खालापूर येथे मयत झाले असून त्यांना अर्जदार कोंडू कानू घाटे व धोंडू कानू घाटे हे भाचे आहेत. अर्जदार यांनी मयत कै.गंगा जानू धनगर उर्फ बावदाने व कै.साईबाई गंगा धनगर उर्फ बावदाने यांचे कायदेशीर वारस आहेत. यासाठी सदरील अर्ज मे.कोर्टात दाखल केलेला आहे. तरी सदरील वारसा संदर्भात कोणाचीही कसलीही हरकत असल्यास १५ दिवसात मे.पनवेल कोर्टात येवून कळवावे. तसे नाही कळविले तर मागून येणाऱ्या हरकतींची दखल घेतली जाणार नाही.

सदरील अर्जाची पेपर नोटीस ४ माहे १२ सन २०२१ रोजी प्रसिद्ध करण्यास दिली आहे.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल



### जाहीर नोटीस

मे.ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब प्रथमवर्ग खालापूर यांचे कोर्टात
फौ.चौ.अर्ज क्र.३५९/२०२१

सौ.अंजना रघुनाथ जाधव
पुर्वाश्रमीची अंजना रामा शिंदे
वय : ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा.तांबस, ता.कर्जत, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

सरपंच / ग्रामसेवक
ग्रुप ग्रामपंचायत वावोशी
मु.वावोशी, ता.खालापूर, जि.रायगड — सामनेवाले

अर्ज जन्म मृत्यू नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) प्रमाणे

अर्जदार यांनी खालापूर येथील ज्युडिशियल मॅजिस्ट्रेट साहेब, प्रथम वर्ग यांचे कोर्टात चौ. अर्ज ३५९/२०२१ हा अर्ज अर्जदार यांचा जन्म ता.०१/०६/१९७१ रोजी मौजे : वावोशी, ता.खालापूर, जि.रायगड येथे झाला आहे. अर्जदार यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत वावोशी येथे त्यांचे जन्म नोंदणी रजिस्टरमध्ये केलेली नसल्याने अर्जदार यांनी त्यांच्या जन्माची नोंद घेणेकामी मा.कोर्टाकडून आदेश मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर अर्जदार यांच्या जन्माची नोंद ता.०१/०६/१९७१ ही नाही व तसा जन्म नोंदणीचा आदेश देण्यात येवू नये, असे म्हणणे असेल त्यांनी उपनिर्दिष्ट प्रकरणी मा.कोर्टात दि.२७/०१/२०२२ रोजी अथवा ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत हजर राहून आपल्या हरकती लेखी कळवाव्यात जर मुदतीत कोणाकडूनही हरकत उपस्थित झाली नाही तर मा.कोर्ट अर्जदाराचा लागलीच पुरावा घेवून अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचे लाभात त्यांची उशिराने झालेली नोंद करण्याचा आदेश पारित करेल याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

आज दि.१४/१२/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
न्याया. खालापूर, रायगड

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
न्याया. खालापूर, रायगड



मा.मुजावर सो.कोर्ट

अर्जदार यांचे वकील
ॲड.आर.आर.पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मा.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज क्र.१९१२/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२१/०१/२०२२

श्रीमती.गुणाबाई उर्फ गुणा रामा पाटील — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, कै.शिवराम रामा पाटील यांचे निधन दि.०२/०३/२०२० रोजी झाले आहे. सदर कै. शिवराम रामा पाटील यांचे मृत्यूसमयी खालील वर्णनाच्या जंगम मिळकती ह्या त्यांचे नावे होत्या. त्यांचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**जंगम मिळकती**

| अ. क्र. | बँकेचे नाव | खाता क्रमांक | खाता प्रकार | खात्यातील रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | स्टेट बँक ऑफ इंडिया, कामोठे | १०५७३५५६५८४ | बचत खाता | ७,२७,७६१/- |
| २ | स्टेट बँक ऑफ इंडिया, कामोठे | ३५९०२७९७६८१ | फिक्स डिपॉझिट | ६५,५९०/- |
| ३ | स्टेट बँक ऑफ इंडिया, कामोठे | ३५९२११५३३२७ | फिक्स डिपॉझिट | २५,२३६/- |
| ४ | स्टेट बँक ऑफ इंडिया, कामोठे | ३८९०२७४४३९८ | फिक्स डिपॉझिट | १३,३७,९७३/- |

बजाज ऑटो लिमिटेड कंपनीची थ्री व्हिलर रिक्षा जिचा क्रमांक MH 05 DQ 3591, Permit No. MH/5CC/AUTO/2018/2710

कै.शिवराम रामा पाटील यांचे मृत्यूपश्चात त्यांच्या असलेल्या सर्व जंगल मालमत्ता या वारसा हक्काने अर्जदार यांच्याकडे आलेल्या आहेत. त्यामुळे सदर अर्जदार यांना सदर मिळकती संदर्भात वारसदाखला / सक्सेशन सर्टीफिकेट मिळणेकरिता त्यांनी या मा.न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

तरी, सदर अर्जदार यांचे या अर्जास कोणाही व्यक्तीस काही हरकत, आक्षेप असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या मा.न्यायालयात प्रत्यक्ष हजर राहून, आपल्या हरकती व आक्षेप पुराव्यानिशी दाखल करावेत. याप्रमाणे दिलेल्या कालावधीमध्ये पुराव्यानिशी हरकत न घेतल्यास हे मा.न्यायालय अर्जदार यांना ते कै.शिवराम रामा पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याबाबतचा सदर मिळकतीसंदर्भात सक्सेशन सर्टीफिकेट देण्याबाबत आदेश करण्यात येतील, याची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि.१५/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल


पृष्ठ क्र.१ वरुन...

## कैलास पायगुडे मनगटावर घड्याळ बांधणार की शिवबंधन? याकडे सर्वांचे लक्ष

जिल्हा परिषद निवडणुकित त्यांच्या पत्नी सौ.ज्योती पायगुडे यांचा पराभव झाला तरीही ते राजकारणात सक्रिया राहीले आणि थेट सरपंच पदाच्या निवडणुकीत गेली अनेक वर्षे राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असलेल्या गिरणे ग्रामपंचायतीवर त्यांनी कमळ फुलविले.कैलास पायगुडे यांचा चांगला जनसंपर्क असून प्रशासनावर चांगला वचक आहे.

भाजपात प्रचंड नाराजी असलेले पायगुडे गेली काही दिवसांपासून राष्ट्रवादी काँग्रेसच्या विशेषतः खा.सुनील तटकरे यांच्या संपर्कात होते. तटकरे-पायगुडे यांच्या भेटीत पक्ष प्रवेशाचीही चर्चा झाल्याची सर्वत्र संध्या सांगण्यात आले आहे. त्यामुळे पायगुडे या पुढच्या दिवसात कोणत्या नव्या पक्षात प्रवेश करणार याची उत्सुकता आहे.

## नवीन वर्ष, ख्रिसमस, थर्टी फर्स्टच्या पार्ट्यांवर कोणत्याही निर्बंध नसणार : ना.राजेश टोपे

करत आहे. त्यांच्या हेतूवर मला शंका नाही. हे गैरसमज दूर करण्याचं काम आरोग्य विभाग करत आहे. सध्या रज्यात दररोज ८ लाख लसीकरण केलं जात असून नागरिकांनी लसीकरण करून घ्यावं, असं आवाहन देखील टोपे यांनी केलं.

## आरक्षणांबाबत केंद्र सरकारने नेहमीच नकारात्मक भूमिका घेतली : अशोक चव्हाण

द्या किंवा तीन महिन्यांसाठी पुढे ढकला, अशी मागणी राज्य सरकारने सर्वोच्च न्यायालयात केली होती. परंतु, दुर्दैवाने ती देखील मान्य झाली नाही. निवडणूक स्थगित करण्याबाबत आज राज्य मंत्रिमंडळात चर्चा झाली असून, यासाठी निवडणूक आयोगाकडेही दाद मागितली जाईल, असे अशोक चव्हाण पुढे म्हणाले.

## शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे विविध प्रलंबित प्रश्न मार्गी

कारणे देत त्यांना वेतनापासून वंचित ठेवले जात आहे. निधी उपलब्ध असतानाही शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन लाभापासून दूर ठेवणाऱ्या वेतन अधीक्षक अधिकाऱ्यांना मुंबई उपसंचालक कार्यालयात बोलाविण्यात यावे आणि त्यांना योग्य ती समज देण्यात येऊन संबंधित शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन तत्काळ करण्यात यावे.अशी मागणी यावेळी आमदार बाळाराम पाटील यांनी केली.

लवकरच सर्व विभागांतील वेतन पथक अधिकाऱ्यांना बोलावून २०% अनुदान प्राप्त कनिष्ठ महाविद्यालयातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्याबाबत सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या जातील. असे आश्वासन मुंबई उपसंचालक सांगवे यांनी बाळाराम पाटील यांना दिले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# पद्मदुर्ग जागरवर कोरोनाचे सावट : शासनाच्या नियमांचे पालन करुन होणार सोहळा

**दै.रायगड नगरी । राजीव नेवासेकर**

**कोर्लई** : मुरुड मधील ऐतिहासिक पद्मदुर्ग (कासा) किल्यावर थाटामाटात साजरा होणारा पद्मदुर्ग जागर सोहळा यंदाही कोरोना- ओमायक्रान रोगाच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या अटि नियम व शर्तीचे पालन करण्यात येऊन ठराविक मान्यवरांच्या उपस्थितीत अत्यंत साधेपणाने साजरा करण्यात येणार असल्याचे तसेच ज्या दुर्गप्रेमींनी कोरोना लसीचे दोन डोस घेतले आहेत.त्यांनाच कार्यक्रमात सहभागी होता येईल.अशी माहिती पद्मदुर्ग जागर व संवर्धन समितीचे अध्यक्ष अशिलकुमार ठाकूर यांनी दिलीआहे.

पद्मदुर्ग जागर व संवर्धन समितीतर्फे रविवार दि.२६ डिसेंबर रोजी साजरा करण्यात येणा-या या सोहळ्याचे १३ वे वर्षे असून यंदा कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर सोहळा अत्यंत साधेपणाने मर्यादित स्वरुपात दुर्गप्रेमींच्या उपस्थितीत साजरा करण्यात येणार आहे.

यादिवशी मुरुड-कोळीवाड्यातील राधाकृष्ण मंदिर येथून शिवरायांची पालखी बोटीतून पद्मदुर्ग (कासा) किल्लयात जाणार असून कोटेश्वरी मातेचे मूळ स्थान ठिकाणी मातेचे विधिवत पूजन व ओटी भरल्यानंतर पालखी किल्लयात प्रवेश केल्यावर शिवरायांचा अभिषेक व आरती केली जाईल.सर्व उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात येणार आहे.प्रमुख वक्ते कु.अनिकेत अशोक पाटील शिवरायांच्या कार्याची व किल्लयांची माहिती देणार आहेत. यावेळी दांडपट्टा, तलवारबाजी, मल्लखांब व इतर शौर्यबाजी खेळांचे सादरीकरण करण्यात येणार आहे.यानंतर प्रसाद वाटप व गडावर पालखी मिरवणूकीने सोहळ्याची सांगता होणार आहे.

पद्मदुर्ग जागर,स्वरूप रूपरेषा जागरमध्ये सहभागी होण्यासाठी प्रतेकी १०० कूपन घेणे आवश्यक आहे.त्या मधे आपणाला बोटीचा प्रवास,तसेच किल्लयामध्ये प्रसाद स्वरूप आल्पो पहार दिले जाईल.तसेच पद्मदुर्ग जागर मधे सहभागी होण्यासाठी सकाळी ७ ते १० वाजे पर्यंत बोट सेवा सुरू राहील.तसेच परतीचा प्रवास दुपारी १ वाजल्या पासून सुरू होईल.

पद्मदुर्ग जागर व संवर्धन समितीचे अध्यक्ष अशिलकुमार ठाकूर, उपाध्यक्ष संकेत आरकशी, सचिव ज्येष्ठ पत्रकार मदन हणमंते, योगेश सुर्वे,राहूल कासार, सुनील शेळके, अच्युत चव्हाण, महेश साळुंखे, महेंद्र मोहिते,रुपेश जामकर, खारअंबोली व मजगांव ग्रुप व दुर्गप्रेमी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेत आहेत.



# देवकान्हे ते चिल्हे मार्ग पक्क्या डांबरीकरणाचे प्रतिक्षेत

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रोहे तालुक्यातील खांब-पालदाड अंतर्गत येणाऱ्या देवकान्हे ते चिल्हे मार्गाच्या प्रचंड दुरास्थेमुळे अपघातास कारणीभूत ठरत असल्याने सध्या हा मार्ग पक्क्या डांबरीकरणाचे प्रतिक्षेत आहे.

दिवाळी सणापूर्वी या मार्गावरील छोटे मोठे खड्डे डांबर टाकून बुझविण्यात आले. जेणेकरून या मार्गाचे पक्के डांबरीकरण करण्यात येईल. दिवाळी सणापासून महिना-दीड महिन्याचा कालावधी लोटला तरी या मार्गाचे पक्के डांबरीकरणाचे कामास प्रारंभ न झाल्याने प्रवासीवर्ग व वाहन चालक यांच्याकडून डांबरीकरणाचे कामाबाबत प्रश्न उपस्थित केला जाऊ लागला आहे. तर गत वर्षी देखील याच पद्धतीने या मार्गावरील छोटे मोठे खड्डे डांबरीने बुझविण्यात आले होते.परंतू संपूर्ण वर्ष गेला तरी पक्के डांबरीकरणाचे काम पुर्ण होऊ शकले नाही. त्यामुळे गत वर्षाप्रमाणे याही वर्षी या मार्गाचे पक्के डांबरीकरण होते की तसेच राहते याबाबतही सवाल उपस्थित केला जाऊ लागला आहे.

खांब-पालदाड अंतर्गत येणारा देवकान्हे ते चिल्हे मार्ग अगोदरच अरूंद स्वरूपाचा असल्याने येथून मार्गक्रमण करताना वाहनचालकांना विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यातच या मार्गाची झालेली दुरावस्था पाहता पक्के डांबरीकरण करणे गरजेचे असल्याने लवकरात लवकर येथील पक्क्या डांबरीकरणाचे काम पुर्ण करून प्रवासीवर्ग व वाहनचालकांना होणाऱ्या त्रासापासून सुटका करावी अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.


अॅड.एस.के.झेंडे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश व.स्तर यांचे कोर्टात

स्पे.दि.मु.नं.५२६/२०१०
नि.नं.४९
ने.ता.०९/०२/२०२२

श्री.विजय विलास वेताळ
वय : ४९ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.सागरदर्शन को.ऑप.हौसिंग सोसायटी,
प्लॉट नं.अे-२३ अे, रुम नं.३०४,
सेक्टर नं.१२, खारघर, नवी मुंबई-४००६१४ — वादी

विरुद्ध

१) श्री.मिलींद दादासाहेब साळुंखे
२) श्रीमती.वंदना विलासराव कदम
३) इस्टेट ऑफिसर (एच.क्यू)
सिडको लिमिटेड
४) सचिव
सागरदर्शन को.ऑप.हौसिंग सोसायटी — प्रतिवादी

लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

वादींनी तुमच्या विरोधात दिवाणी दावा दाखल केलेला आहे. दिवाणी दाव्यामध्ये तुम्ही सामनेवाला (उत्तर देणारे) विशेष दावा सागर दर्शन को. ऑप.हौसिंग सोसायटी, तिसरा मजला, रुम नं.३०४, प्लॉट नं.ए-२३-ए, सेक्टर १२, खारघर, नवी मुंबई या रुमच्या मालकी संबंधित न्यायालयात वाद दाखल केला आहे. म्हणून सदर दाव्याच्या संबंधात आपले म्हणणे मांडण्यासाठी दिनांक ०९/०२/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात आपण जातीने किंवा ज्यास यांच्या योग्य सुचना दिलेल्या असून जे वाद संबंधीच्या सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकेल असा सर्व प्रश्नांची उत्तरे देवू शकणारी व्यक्ती त्यांच्याबरोबर असेल अशा वकीलांमार्फत हजर होण्यासाठी तुम्हाला याद्वारे बोलाविण्यात येत आहे व तुमच्या हजेरीसाठी ठरलेल्या दिवशी वादाच्या निर्णयासाठी नेमलेला दिवस असल्यामुळे तुमच्या बचावाच्या पृष्ठ्यर्थ तुम्ही ज्या साक्षीदारांच्या साक्षीच्या ज्या दस्त ऐवजाचा आधार घेवून इच्छिता ते सर्व साक्षीदार व सर्व दस्तऐवज ज्या दस्त ऐवजाचा आधार घेवू इच्छिता ते सर्व साक्षीदार व सर्व दस्तऐवज त्या दिवशी हजर करण्याची तुम्हाला तयारी ठेवावी लागेल.

तुम्हाला नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिवशी हजर न राहिल्यास तुमच्या गैरहजेरीत वादीची सुनावणी होवून निर्णय दिला जाईल, याची दखल घ्यावी. प्रतिवादी नं.२ वंदना विलास कदम यांना जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे.

तसेच तुम्हाला अशीही नोटीस देण्यात येत आहे की, उपरोक्त दिनांकात किंवा तत्पूर्वी तुम्ही बजावणीसाठी तुमचा पत्ता दाखल न केल्यास तुमचा जाबाब रद्द होण्यास पात्र ठरेल. आज दिनांक वरील प्रमाणे मुदतीमध्ये नेमून दिलेल्या तारखेस मा.न्यायालयात दाव्याच्या कामी योग्य तो पुरावा घेवून हजर रहावे आणि मुदतीनंतर आलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. आज दि.२६ माहे नोव्हेंबर सन २०२१ रोजी आमच्या सहीने कोर्टाच्या शिक्क्यासह प्रसिद्ध केली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



मा.श्री.सोनावणे साो. यांचे कोर्टात

अर्जदारांतर्फे वकील
अॅड.प्रशांत म. भोईर

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१८०९/०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१५/०१/२०२२

१) श्रीमती.शोभा यशवंत घरत
रा.मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.प्रतिभा संतोष वर्तक
रा.एल.आय.जी.१/ए-७८, सेक्टर २,
कळंबोली कॉलनी, ता.पनवेल, जि.रायगड
३) श्री.विजय यशवंत घरत
रा.पी.एल.६, एल-२/१६, सह्याद्री अपार्टमेंट,
सेक्टर १४, खांदा कॉलनी, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड
४) श्री.राजेश यशवंत घरत
रा.पी.एल.६, एल-२/३/१६, सह्याद्री अपार्टमेंट,
सेक्टर १४, खांदा कॉलनी, नवीन पनवेल,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, कै.यशवंत बाळाराम घरत हे दि.२३/०५/२०२१ रोजी रिलायन्स हॉस्पिटल कोपरखैरणे येथे मयत झाले असून त्यांचे वडील कै.बाळाराम लाडक्या उर्फ लिकऱ्या घरत हे दि.१२/०९/२००४ रोजी व त्यांच्या आई कै.महादूबाई उर्फ महादीबाई बाळाराम घरत ह्या दि.२४/०७/२००८ रोजी मु.पो.उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. अर्जदार क्र.१ ह्या कै.यशवंत बाळाराम घरत यांच्या विधवा पत्नी असून २ ते ४ ही त्यांची मुले असून कायदेशीर वारसदार आहेत. त्यांचे नावे असलेल्या जमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

अ) कै.बाळाराम लाडक्या उर्फ लिकऱ्या घरत यांचे नावे असलेल्या मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ.नं. | गावाचे नाव | यु.केस नं. | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | उलवे | १६७ | ८० | ५ | ०-१७-० |
| २ | उलवे | १४८ | ४ | ८ | ०-०८-० |

ब) कै.महादूबाई उर्फ महादीबाई बाळाराम घरत यांचे नावे असलेल्या मौजे : उलवे, सोनखार, तरघर, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | गावाचे नाव | यु.केस नं. | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|---|
| १ | उलवे | ६ ब | ८९ | ६ | ०-१२-० |
| २ | उलवे | ६ अ | ४ | ३ | ०-०९-० |
| | | | ७ | ८ | ०-०९-० |
| | | | ११३ | ६ | ०-०२-० |
| ३ | सोनखार | ११२ | १७ | १२ | ०-०२-४ |
| ४ | तरघर | १६२ ब | १० | ५ | ०-९-६ |

क) कै.यशवंत बाळाराम घरत यांचे नावे असलेल्या मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | गावाचे नाव | यु.केस नं. | सर्वेक्षण क्र. | घर क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | उलवे | ULV-ICIG-66 | UL-159, UL-160 | ६२ अ | १९४.२२ चौ.मी. |

वरील घर मिळकतीचे मोबदल्यात सिडकोने खालीलप्रमाणे भूखंडाचे वाटप केलेले आहे.

| गावाचे नाव | सेक्टर क्र. | भूखंड क्रं. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| उलवे (पुष्पक) | २४ | १५५ | ५९० चौ.मी. |

ड) कै.यशवंत बाळाराम घरत यांचे नावे असलेल्या मौजे : नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड येथील मिळकतीचे (सदनिका) वर्णन

PNL-14/PL6 A/2, 3 rd floor, Apartment No.16, (3:16), Sector 14 (w), New Panvel, Admeasuring 54.03 sq.mtrs.

येणेप्रमाणे मिळकती असून कै.यशवंत बाळाराम घरत यांचे मृत्यूपश्चात त्यांचे वारसदार म्हणून अर्जदार क्र.१ ते ५ यांस मिळावेत याकरिता अत्यावश्यक तो वारसदाखला मिळावा म्हणून या न्यायालयात अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

तरी अर्जदार यांच्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलांमार्फत हरकत न घेतल्यास नामदार कोर्ट योग्य त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.१५/१२/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी सदरची जाहीर नोटीस दिली.

**सही/-**
**क.लिपीक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दि.न्या.व.स्तर, पनवेल**



## जिल्हा परिषद रायगड
## शिक्षण विभाग (प्राथमिक)
## (शालेय पोषण आहार योजना)

शालेय पोषण आहार योजनेंतर्गत रायगड जिल्हा परिषदेंतर्गत रिक्त असणारी डाटा एन्टी ऑपरेटरची पदे तात्पुरत्या स्वरुपात पुढील एक वर्षाच्या कालावधीकरिता कंत्राटी पद्धतीने एकत्रित मानधनावर भरण्यात येणार आहेत. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक व व्यावसायिक अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारांचे अर्ज सोबत दिलेल्या विहित नमुन्यात शिक्षण विभाग (प्राथमिक), रायगड जिल्हा परिषद अलिबाग येथे दि.२३/१२/२०२१ अखेर पर्यंत सकाळी १०.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत या कार्यालयीन वेळेत समक्ष अथवा पोस्टाने सुट्टीचे दिवस वगळून स्वीकारले जातील.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | मासिक एकत्रित परिश्रमिक | शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| १ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | जिल्हास्तर-० <br> तालुकास्तर-७ <br> एकूण ७ | रु.१५९००/- | १) किमान १२ वी पास <br> २) मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. <br> ३) इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. <br> ४) एम.एस.सी.आय.टी. तसेच तत्सम कोर्स D.O.E.A.C.C. व GCC-TBC परिक्षा असणे आवश्यक |

१) वयोमर्यादा :- उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व कमाल ३८ वर्षे

२) निवड पद्धती :-

२.१) शैक्षणिक व व्यावसायिक अटी पूर्ण करणाऱ्या उमेदवारास १० वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी आणि इ.१२ वी मध्ये मिळालेल्या गुणांची टक्केवारी यांची सरासरी काढण्यात येईल. त्याचप्रमाणे एखादा उमेदवार पदवीधर असल्यास त्याला १० गुण बोनस देण्यात येतील. गुणांकन करून उमेदवारांनी गुणवत्ता यादी तयार करून गुणवत्ता यादीतील उमेदवारांना संगणक परिक्षेकरिता एका पदासाठी गुणानुक्रमे १२ उमेदवार याप्रमाणे बोलाविण्यात येईल.

२.२) सदर गुणवत्ता यीमधील उमेदवारांची मराठी टायपिंग-३० शब्द प्रति मिनिट, इंग्रजी टायपिंग-४० शब्द प्रति मिनिट व संगणक ज्ञान प्रात्यक्षिक परिक्षा अशी एकूण १०० गुणांची परिक्षा घेण्यात येईल.

२.३) सदर २.२ मधील ज्या उमेदवारांना परिक्षेमध्ये किमान ५० गुण प्राप्त होतील असेच उमेदवार डाटा एन्ट्री ऑपरेटर पदासाठी पात्र राहतील.

२.४) उमेदवारास २.१ व २.२ मधील शैक्षणिक पात्रतेबाबत मिळालेल्या गुणांची बेरीज करून गुणानुक्रमे मंजूर पदाएवढी निवड यादी प्रसिद्ध केली जाईल आणि त्यानुसार सदर उमेदवारांना कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्ती देण्यात येईल व तेवढ्याच पुढील उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिद्ध केली जाईल.

२.५) सदर पदांसाठी मुलाखत घेण्यात येणार नाही.

३) सुचना :-

३.१) उमेदवारांनी विहित नमुन्यात अलीकडच्या काळातील साक्षांकित पासपोर्ट साईज फोटोसह अर्ज सादर करावा.
सदर अर्जाच्या पाकीटांवर डाटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज असे नमूद करावे.

३.२) अर्जासोत शैक्षणिक पात्रता, व्यावसायिक पात्रता, वय, अनुभव, इत्यादींसंदर्भातील कागदपत्रांच्या छायांकित साक्षांकित प्रती जोडाव्यात.

३.३) अर्जासोबत स्वतःचे पूर्ण नाव व पत्ता असलेला ४×६ आकाराचा असलेला रिकामा रु.५ चे पोस्टाचे तिकिट लावलेला लिफाफा पाठविण्यात यावा.

३.४) परिक्षा शुल्क : उमेदवारांनी अर्जासोबत परिक्षा शुल्क म्हणून रक्कम रुपये ५००/- (रक्कम रुपये पाचशे मात्र) रक्कमेचे डिमांड ड्राफ्ट शालेय पोषण आहार योजना शिक्षणाधिकारी (प्राथमिक), रायगड जिल्हा परिषद अलिबाग यांचे नावे राष्ट्रीयकृत बँकेचे डिमांड ड्राफ्ट अर्जासोबत जोडलेले असणे आवश्यक आहे.

३.५) अर्ज करण्याची अंतिम दि.२३/१२/२०२१ असेल. त्यानंत आलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

३.६) नियुक्ती पूर्वी उमेदवाराकडून शासनाकडील विहित नमुन्यात करारनामा करून घेण्यात येईल आणि त्याचप्रमाणे कर्मचाऱ्यांवर कोणत्याही प्रकारचा गुन्हा व आरोप नसल्याचे प्रतिज्ञापत्र स्वतंत्रपणे सादर करावे लागेल. कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदासंबंधी सेवा शर्ती, शैक्षणिक अर्हता, एकत्रित ठोक मानधन व नियुक्तीची कार्यपद्धती यासंबंधी आवश्यक ते बदल तसेच निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

३.७) कंत्राटी पद्धतीने नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांची सेवा करारपत्रात नमूद केलेल्या कालावधीनंतर सेवा आपोआप संपुष्टात येईल व शासकीय सेवेवर हक्क मागता येणार नाहीत.

३.८) डाटा एन्ट्री ऑपरेटर म्हणून नियुक्त केलेल्या कंत्राटी पद्धतीच्या कर्मचाऱ्यांस नियमित सेवेचे कोणतेही लाभ मिळणार नाही.

३.९) सदर पदांची भरती कंत्राटी पद्धतीने करावयाची असल्याने बिंदू नामावली लागू राहणार नाही.

**सही/-**
**सदस्य सचिव**
**जिल्हा निवड समिती तथा**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**रायगड जिल्हा परिषद अलिबाग**

**सही/-**
**अध्यक्ष**
**जिल्हा निवड समिती तथा**
**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**रायगड जिल्हा परिषद अलिबाग**

जिल्हा परिषद ------------------------------- शिक्षण विभाग (प्राथमिक)

शालेय पोषण आहार योजना-डाटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज-२०२१

अर्जाचा कार्यालयीन नोंदणी क्रमांक : ---------------------- दिनांक : -------------

प्रति,
सदस्य सचिव
जिल्हा निवड प्रक्रिया समिती
तथा शिक्षणाधिकारी प्राथमिक
जिहा परिषद अलिबाग

उमेदवाराचा अलिकडच्या काळातील राजपत्रित अधिकारी यांनी साक्षांकित केलेला पासपोर्ट साईज फोटो

विषय :- **शालेय पोषण आहार योजना सन २०२१**
**डाटा एन्ट्री ऑपरेटर पदाकरिता अर्ज**

१) उमदेवाराचे नाव :- श्री/श्रीम.------------------------------------------
(आडनाव) (स्वतः चे नाव) (वडिलांचे/पतीचे नाव)

२) पत्रव्यवहाराचा पत्ता : -----------------------------------------------

३) जन्मतारीख (शालान्त प्रमाणपत्रानुसार) ----------------------------------------

४) वय (दिनांक / /२०२१) ------वर्ष-------महिना-------दिवस--------

५) अर्जदराची शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता

| अ.क्र. | परिक्षेचे नाव | परिक्षा मंडळ/ विद्यापीठाचे नाव | उत्तीर्ण वर्ष | गुणांची टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | १० वी | | | | |
| २ | १२ वी | | | | |
| ३ | पदवी | | | | |
| ४ | मराठी टंकलेखन ३० श.प्र.मि. | | | | |
| ५ | इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि. | | | | |
| ६ | एम.एस.सी.आय.टी. | | | | |

६) अनुभव

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | धारण केलेल पद | सेवा कालावधी (पासून-पर्यंत) | एकूण सेवा |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |

अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या साक्षांकित छायांकित प्रती

१)----------------------- २)-----------------------
३)----------------------- ४)-----------------------
५)----------------------- ६)-----------------------

## प्रतिज्ञापत्र

प्रमाणित करतो / करते की, सदर अर्जात सादर केलेली माहिती खरी आहे. सदर माहिती खोटी अथवा चुकीची आढळून आल्यास माझी निवड रद्द करण्यात यावी. त्यास माझी कोणतीही हरकत राहणार नाहीत.

दिनांक :

स्थळ : (उमेदवाराची स्वाक्षरी)

# संक्षिप्त...

## पाली पाटणूस राज्य महामार्गावरील रिलायन्स जिओ कंपनीचा अनधिकृत मोबाईल टॉवर हटविण्याचे तहसिलदारांचे आदेश

**दै.रायगड नगरी । सुधागड/पाली**

पाली पाटणूस राज्य महामार्गावर अडुळसे गा- वालगत रिलायन्स जिओ इन्फ्राटेक प्रा. ली. कंपनीने अनधिकृतपणे नियमांचे उल्लंघन करून उभारलेला मोबाईल टॉवर हटविण्याचे आदेश गुरुवारी (ता.१०) पाली सुधागड तहसीलदार दिलीप रायण्णावार यांनी दिले आहेत.

या धोकादायक अनधिकृत टॉवर संदर्भात येथील स्थानिक रहिवासी संतोष बावधाने यांनी तहसील कार्यालयात तक्रार केली होती. तसेच यासंदर्भात वर्षभर पाठपुरावा देखील करत आहेत. त्यानुसार पाली–सुधागड तहसिलदारांनी पाहणी करून व कागदपत्रांची तपासणी करून संबंधित टॉवर हटविण्याचा आदेश दिला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अ (३) अन्वये जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडून औद्योगिक कारणाकरिता बिनशेती परवानगी न घेता या टॉवरचे अनधिकृत बांधकाम केल्याचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे बिनशेती दंड रक्कम शासन जमा करून या टॉवरचा अनधिकृत वापर ४ दिवसात बंद करण्यात यावा तसेच हा वापर बंद न झाल्यास हे बांधकाम शासकीय खर्चाने दूर करण्यात येईल असे आदेश तहसिलदारांनी पत्रात दिले आहेत.

याबरोबरच टॉवरचे बांधकाम रस्त्याच्या मध्यापासून ५० मीटर अंतराच्या आतमध्ये येते. म्हणजेच हा टॉवर रस्त्यापासून १५.६० मीटर अंतरावर असल्याने समांतर रेषा नियमानुसार अनधिकृत ठरत असल्याने हा टॉवर काढून टाकण्यात यावा अशी नोटीस उपविभागीय अभियंता यांच्याकडून ३ नोव्हेंबर रोजी देण्यात आली आहे. याआधी वेळोवेळी सूचना देऊनही सदर अनधिकृत टॉवरचे बांधकाम काढून टाकण्यात आलेले नाही. तसेच टॉवर असलेल्या जागेजवळ राज्य महामार्ग असून सदर ठिकाणी अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे या ठिकाणी कोणतीही जीवित हानी झाल्यास सर्वस्वी संबंधित कंपनी जबाबदार असेल. त्यामुळे हे बांधकाम लागलीच हटविण्यात यावे अन्यथा शासकीय खर्चात हटविले जाईल व यासाठी येणारा खर्च जमीन महसूल थकबाकी म्हणून वसूल करण्यात येईल असे देखील पत्रात नमूद केले आहे.

# माथेरान मधील भाडेपट्टा मिळकती कब्जा हक्काने मंजूर कराव्यात : शिवाजी शिंदे

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : माथेरान नगरपरिषद हद्दीतील ब्रिटिश कालीन भाडेपट्टा मिळकती विधिवत ताबा असलेल्या जमीन धारकास बाजार मूल्यांकनाच्या आधारावर कब्जा हक्काने मंजूर कराव्यात अशी मागणी काँग्रेसचे विद्यमान नगरसेवक शिवाजी शिंदेंनी राज्याचे महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या मुंबई येथील दालनात समक्ष भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले आहे.यावेळी त्यांच्या सोबत माथेरान शहर काँग्रेस अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.



ठाण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी सर ह्युज मॅलेट यांनी १८५० मध्ये माथेरानचा शोध लावला होता तदनंतर १९०५ सालापासून इथे नागरी वसाहती करीता गरजेनुसार निवासी व वाणिज्य कारणास्तव भाडेपट्ट्याचे भूखंड वितरीत करण्यात आले होते. तेव्हापासून ते आजमितीपर्यंत माथेरान नगरपरिषद हद्दीत सुमारे ४४२ इतक्या निवासी व वाणिज्य स्वरूपाच्या कारणांसाठी खाजगी मालमत्ता आहेत. तत्कालीन प्रसंगी संदरच्या जमीनी नाममात्र पैशांमध्ये भाडे आकारून ९९ वर्षांच्या करारावर भुई भाड्याने देण्यात आलेल्या आहेत. या सर्व मिळकती भाडेपट्ट्याने असल्याने संबंधीत धारकांना बँकांकडून कर्ज उपलब्ध होत नाही. यामुळे सदर भूखंडावरील मिळकती देखरेखीअभावी जीर्ण होऊन त्या नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. यापूर्वी शासन निर्णयाने मौजे नेरळ व कर्जत येथील भाडेपट्ट्याच्या मिळकती प्रचलित बाजार मूल्यांकनाच्या २५% इतकी रक्कम आकारून जमीन धारकास कायमस्वरूपी कब्जा हक्काने देण्यात आलेल्या आहेत त्याच धर्तीवर अधिनियमातील तरतुदींनुसार माथेरान नगरपरिषद हद्दीतील संबधीत भाडेपट्टा मिळकतीवर बाजार मूल्यांकनाच्या आधारे अल्प रक्कम जमीन धारकास कायमस्वरूपी कब्जा हक्काने मंजूर करण्यात याव्यात जेणेकरून स्थानिक नागरिकांना सदर जमिनीचे मालकी हक्क प्राप्त होऊन शासनाच्या तिजोरीत करोडो रुपयांचा महसूल जमा होऊ शकेल असे नगरसेवक शिवाजी शिंदेंनी निवेदनात नमूद केले असून याबाबतच्या प्रति मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य मंत्रालय मुंबई, विभागीय आयुक्त कोकण विभाग कोकण भवन, जिल्हाधिकारी रायगड, उप विभागीय अधिकारी कर्जत, अधिक्षक कार्यालय माथेरान,मुख्याधिकारी माथेरान नगरपरिषद यांच्याकडे माहितीसाठी सादर केल्या आहेत.

### जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून

## आपत्ती व्यवस्थापन विशेष प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील ५० अधिकारी-कर्मचारी भुवनेश्वरला रवाना

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

ओडिशा राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे वतीने मधुसूदन दास अकॅडमी ऑफ फायनान्सियल मॅनेजमेंट, भुवनेश्वर या संस्थेत चक्रीवादळ सौमिकरण व पूर्वतयारी बाबतचे विशेष प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते.

रायगड जिल्ह्याने मागील काही वर्षात निसर्ग, तौक्ते अशा प्रकारची विविध वादळे व अतिवृष्टी, दरड कोसळणे यासारखी नैसर्गिक संकटे अनुभवली आहेत. याचा विचार करुन जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे अध्यक्ष डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी जिल्ह्यातील विविध विभागातील अधिकारी–कर्मचाऱ्यांना चक्रीवादळ सौमिकरण व पूर्वतयारी अंतर्गत प्रशिक्षणाची असलेली गरज ओळखून जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी यांना प्रशिक्षण देण्याबाबतचे नियोजन केले. त्यानुसार त्यांनी रायगड जिल्ह्यातील महसूल, पोलीस, ग्राम विकास विभागाच्या ५० अधिकारी/ कर्मचाऱ्यांना दि. १५ ते १७ डिसेंबर २०२१ या कालावधीत मधुसूदन दास अकॅडमी ऑफ फायनान्सियल मॅनेजमेंट, भुवनेश्वर, ओरिसा येथे चक्रीवादळ सौम्यीकरण व पूर्वतयारी या विषयावरील आयोजित करण्यात आलेल्या प्रशिक्षणासाठी पाठविले आहे.

या प्रशिक्षणासाठी जिल्ह्यातील महसूल विभाग– ७, पोलीस विभाग– १० पोलीस अधिकारी व १० पोलीस कर्मचारी, १५ होमगार्डस् , श्रीवर्धन सरपंच १, घारापुरी उरण सरपंच १, ग्रामविकास विभाग–६ असे एकूण ५० अधिकारी–कर्मचारी व इतर सहभागी झाले आहेत. यानंतरही जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. कल्याणकर व निवासी उपजिल्हाधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण डॉ.पद्मश्री बैनाडे यांच्या मार्गदर्शनाखाली आणखी ५०–५० च्या दोन पथकांना येणाऱ्या पुढील कालावधीत प्रशिक्षणासाठी पाठविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यामध्ये शासनाच्या विविध विभागाच्या अधिकारी – कर्मचाऱ्यांचा, आपत्ती व्यवस्थापनाचे काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांच्या स्वयंसेवकांचा समावेश केला जाणार आहे.

## सुधागड तालुक्यात पोलिसांच्या मदतीला ग्राम सुरक्षा दलाचे सदस्य; पालीत ग्राम सुरक्षा दलाची स्थापना

**दै.रायगड नगरी । गौसखान पठाण**

**सुधागड/पाली** : सुधागड तालुक्यात आता पोलिसांच्या मदतीला ग्राम सुरक्षा दलाचे सदस्य असणार आहेत. बुधवारी (ता.१५) पाली पोलीस स्थानकात रोहा उपविभागीय पोलिस अधिकारी किरणकुमार सूर्यवशी यांच्या प्रमुख उपस्थितीत सुधागड तालुक्यातील ग्रामसुरक्षा दलाची स्थापना करण्यात आली.

यावेळी गावातील युवकांची ग्रामसुरक्षा दलासाठी निवड करण्यात आली. निवडलेल्या सदस्यांना पोलीस ठाण्याच्या वतीने ग्रामसुरक्षा दलाचा लोगो असलेले डकपडे व इतर साहित्य देण्यात आले. यावेळी किरणकुमार सूर्यवंशी यांनी उपस्थित ग्रामसुरक्षा दल–ातील सदस्यांना कायदेशीर मार्गदर्शन व ग्राम संरक्षक पथकाचे स्थापनेचे उद्दिष्ट रचना व कार्य समजावून सांगितले आणि मार्गदर्शन केले. पाली पोलीस स्थानका अंतर्गत येणाऱ्या सर्वच गावांत ग्रामसुरक्षा दल स्थापन केले असल्याचे पोलीस निरीक्षक विजय तायडे यांनी सांगितले. यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी रोहा किरणकुमार सूर्यवंशी, पाली पोलीस निरीक्षक विजय तायडे, पोलीस हवालदार प्रफुल्ल चांदोरकर, पोलीस नाईक शेडगे यांच्यासह ग्राम सुरक्षा दलाचे सदस्य मोठ्या उपस्थित होते.



या सदस्यांनी रात्रीच्या वेळी गावात गस्त घालणे, वेळप्रसंगी नागरिक व पोलिसांची मदत करणे,वाहन अपघात प्रसंगी तातडीने मदत करणे, नैसर्गिक आपत्तीचे वेळी मदत करणे, लोकांच्या संरक्षणासाठी मदत करणे, मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी नेमणूक दिलेले काम करणे. सार्वजनिक सुरक्षितेसाठी कर्तव्य बजावणे, वा–हतूक कोंडीच्या वेळी मदत मागितल्यास पोलिस दलास मदत करणे. साथरोगाचे कार्यालयात मदत मागितल्यास कर्तव्य बजावणे इत्यादी जबाबदाऱ्या पार पडायच्या आहेत.

# भल्यामोठ्या अजगरामुळे माणगांवच्या गजबजलेल्या भरवस्तीत खळबळ

**दै.रायगड नगरी । रवींद्र कुवसेकर**

**उतेखोल/माणगाव** : माणगांवच्या कचेरी रोडवर अशोकदादा साबळे हायस्कुल जवळील रेल्वे पुलाखाली भलामोठा अंदाजे ११–१२ फूटी लांब व मजबुत पूर्ण वाढीचा अजगर गेले दोन तिन दिवसांपासून वावरत होता. मंगळवारी सायंकाळी सात दरम्यान या ठिकाणी ट्रॅफीक जॅम होऊन बघ्यांची गर्दी झाली योगायोगाने कचेरी रोड वरून जात असणारे माणगांव चे वन्यजीव अभ्यासक आणि छायाचित्रकार शंतनु कुवेसकर यांच्या निदर्शनास हे आले असता तेथील ट्रॅफिक थांबवून अगजरास रस्ता ओलांडून जाऊ देण्याचा प्रयत्न त्यांनी केला परंतु खूप मोठ्या प्रमाणात वर्दळ असल्याने व बघ्यांची गर्दी जमल्याने रस्ता ओलांडण्याचा प्रयत्न करणारा अजगर पुन्हा एकदा मागे वळून परत रेल्वे पुला जवळील ट्रॅकच्या दिशेने गर्द झाडीत गेला व अदृश्य झाला. अजगर पुन्हा बाहेर पडल्यास एकतर रेल्वे रुळावरुन रेल्वे खाली येण्याची किंवा दुसऱ्या वस्तीत शिरला असता भीतीने त्याला माणसे मारतील यासाठीच सदरच्या वर्दळीच्या ठिकाणाहून त्याला सुरक्षित ठिकाणी हलविण्याचा निर्णय शंतनु यांनी घेतला.

या भल्या मोठ्या अजगराला रेस्क्यु करणे एकट्याला शक्य नव्हते म्हणुन शंतनुने त्याचा माणगांवमधील सहकारी सर्पमित्र शुभम पाटील यास त्वरित बोलावीले व सोबतीला आणखी एक सर्पमित्र रवि राठोड यांनी अत्यंत सावधानतेने या अजगरास पकडुन पोत्यात बंद केले हे रेस्क्यु ऑपरेशन अडिचतास चालले होते दरम्यान या ठिकाणी शेकडोंच्या संख्येने बघ्यांची गर्दी जमली त्यातून माणगांवमधील तरुण



अभय सुर्वे, मंगू जाधव, सुमीत देशमुख आणि बचाव ठिकाणी उपस्थित असलेल्या इतर काही जणांनी प्रसंगावधान राखून रस्त्या कडेला असलेल्या गर्द झुडूपात प्रथम अजगराच्या शोधकार्यात मदत केली. अनेकांनी हा थरार आपल्या मोबाईल मध्ये रेकॉर्ड केला काहिंनी तर येथुन थेट फेसबुक–इन्स्टाग्राम लाईव्ह प्रसंगाचे चित्रण सुरु केले. बघता बघता ही बातमी माणगांवभर व्हायरल झाली. शंतनुने येथुन या अजगराला सुरक्षित स्थळी सोडण्यासाठी माणगांव वन विभातील अधिकारी यांचेशी संपर्क करुन अजगराला सुरक्षित मनुष्य वसाहती पासुन दूर त्यांचे नैसर्गिक आवासात सोडण्यासाठी विनंती केली असता तात्काळ वनक्षेत्रपाल पी. आर. पाटील यांनी आपले विभागाचे खास वाहन पाठवले.

या अजगराचे मुक्तता कार्य माणगांव चे वन–क्षेत्रपाल पी. आर. पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली वनरक्षक अक्षय मोरे व वनविभाग वाहनचालक विवेक जाधव यांच्या उपस्थितीत योग्य पद्धतीने पार पडले. मोकळे सोडताच काही काळ थांबून अगदी शांतपणे अजगर आपल्या नैसर्गिक आदिवासात नदीच्या पाण्यातून पोहत निघून गेला. माणगांवच्या उपस्थित सर्वच तरुणांनी निसर्ग संवर्धनाबद्दल दाखवलेल्या जागरूकतेमुळे निसर्गघटकातल्या अजगरासारख्या अनमोल जीवाला जीवनदान मिळाले.

## गणेश चंद्रकांत कडु यांना मंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते कोविड योद्धा पुरस्कार



**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिकेचे कार्यतत्पर नगरसेवक व शेकापक्षाचे पनवेल महानगरपालिका शहर जिल्हा चिटणीस, सिद्धीविनायक सोशल वेलफेअर असोसिएशनचे अध्यक्ष, २४ सेवा देणारे एक उत्तम सामाजिक कार्यकर्ते, रायगड भुषण आमचे मार्गदर्शक मा.श्रीण संस्था आंतरराष्ट्रीय एनजीओ,दिल्ली यांच्या माध्यमातून भारताचे केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री मा.श्री.रामदास आठवले यांच्या हस्ते व इतर प्रमुख मान्यवर यांच्या उपस्थितीत कोविड काळात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल कोविड योद्धा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल गणेशदादा चंद्रकांत कडु यांचे मनापासून अभिनंदन आणि पुढील सामाजिक वाटचालीस हार्दिक शुभेच्छा. कोविड काळात स्वतः रुग्णांना स्वतःच्या गाडीत नेवून ॲडमिट करीत असत फ्री मध्ये संस्थेची रुग्णवाहिका दिली रुग्णांना बिल कमी करून देण्यास सहकार्य केले

## वाहतूक शाखेच्या वतीने कारवाईची मोहीम, रिक्षा चालकाने नियम पाळावे : संजय नाळे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लॉकडाऊन मुळे रिक्षा चालक हतबल झालेला आहे. हळू हळू व्यवसाय पूर्व येत आहे सध्या पनवेल वाहतूक शाखा पनवेल आरटिओच्या वतीने कारवाई मोहीम सुरु होणार आहे तरी रिक्षा चालकांना भूर्दंड बसू नये या करिता नवी मुंबई, पनवेल उरण, परिसरातील रिक्षा संघटनाच्या प्रतिनिधीची बैठक पोलीस उपायुक्त कराड व वाहतूक शाखेच्या वतीने घेण्यात आली.

सर्व रिक्षाचालक व मालक यांना महत्वाची सूचना यावेळी करण्यात आली. यात रिक्षा पासिंग, इन्शुरन्स पी यु सी गणवेश व आपले लायसन्स बँच नेहमी सहज दिसेल असे लावावा आर. टी.ओ व वाहतूक शाखे कडुन कडक तपासणी करून कडक कारवाई करण्यात येणार आहे. तरी आपण सावधगिरीने जबाबदारीने आपला रिक्षा व्यवसाय करावा जेष्ठ नागरिक ,गरोदर स्त्रिया,अंध अपंग ,शाळेतील मुलांना प्रथम प्राधान्य द्यावे.

तसेच महाराष्ट्र राज्य व आपल्या राज्य बाहेरून येणाऱ्या प्रत्येक प्रवासी यांच्याशी सौजन्याने वागावे मिटर प्रमाणे भाडे घ्यावे असे उपायुक्त कराड यांनी निर्देश दिले. आर. टी ओ चे दंड भरमसाठ वाढ झालेली आहे. त्यामुळे आपण आपल्या गाडीचे पेपर वेळेत पुर्ण करून घ्यावेत रिक्षा रांगेत लावुनच प्रवासी घ्यावे वाहतूक सिग्नल झेब्रा कॉर्सीग नो पार्किंग गेट समोर गाडी लावु नये तसेच व्यसन करून कधीही वाहन चालवु नका असे पनवेल वाहतूक वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नाळे यांनी या वेळी संघटना प्रतिनिधीना या वेळी सूचित करण्यात आले. रिक्षा चालकांना कारवाई होण्या अगोदर माहित दिल्याने रिक्षा चालक सर्व नियम काटे कोर पाळ–तील असा रिक्षा संघटनेच्या पदाधिकारी यांनी विश्वास दिला. या बैठकीमध्ये या वेळी पनवेल उरण नवी मुंबई येथील रिक्षा संघटना उपस्थित होते.


# वणवे उठतायत वनसंपदा व पशु-पक्षांच्या जिवावर

**दै.रायगड नगरी । धम्मशील सावंत**

**पाली/बेणसे** : पश्चिम घाटाचा विस्तिर्ण पट्टा, विपुल जैवविविधता व डोंगरदर्यांनी वेढलेला आणि ऐतिहासिक वारशांचा ठेवा म्हणून रायगड जिल्हा ओळखला जातो. मात्र येथे वारंवार लागणाऱ्या वणव्यामुळे वनसंपदा व पशू–पक्षांचे अस्तित्व धोक्यात आले आहे.

दोन दिवसांपूर्वी विळे भागाड एमआयडीसी भागातील डोंगरावर व माळरानावर प्रचंड मोठा वणवा लागला होता. येथील स्थानिक पर्यावरण व निसर्ग अभ्यासक राम मुंढे यांनी या भागाची पाहणी केली असता या वनव्यामध्ये ठिपकेवाली मुनिया आणि इतर पक्षांची घरटी पूर्णपणे जळून गेली आहेत. शिवाय पूर्ण विकसित झालेली अंडी देखील जळाली आहेत. अशाच प्रकारचे वणवे ठिकठिकाणी लागणे सुरू झाले आहे. पालीतील सरसगड किल्लयावर मागील वर्षी तब्बल ६ वेळा वणवा लागला होता यामध्ये नव्याने लावलेले रोपे व वृक्ष जळून खाक झाली होती. शिवाय येथील माकडे, वानरे व पक्ष्यांच्या अन्नाचा प्रश्न निर्माण झाला. तसेच त्यांचा अधिवास देखील नष्ट झाला.

पावसाळ्यात जिल्ह्यातील डोंगर, माळरान, किल्ले, गड, जंगल या सर्व ठिकाणी पावसाळ्यात मोठया प्रमाणात छोटी झुडपे व गवत उगवते. परंतु ऑक्टोंबर नंतर वाढत्या उष्म्याने ही झुडप व गवत सुकते आणि अशा माळरान, डोंगर व शेतात सुकेल्या झुडप व गवताला नैसर्गिकरीत्या वणवा लागतो, तर काही लोक कळत–नकळत आग



लावतात. या आगीचे रुपांतर प्रचंड नैसर्गिक व कृत्रिम वणव्यात होते. दरवर्षी जिल्ह्यात हजारो हेक्टर क्षेत्रावर असे वणवे लागतात. परिणामी या आगीत झाडे–झुडपे, पशू–पक्षी, सूक्ष्मजीव तसेच सरपटणारे प्राणी यांचा जळून मृत्यु होवुन सजीवसृष्टीवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. जिल्ह्यातील विविध ऐतिहासिक वास्तू आणि किल्लयांवरील हे वणवे या ऐतिहासिक वस्तूंना देखील नुकसान पोहचवत आहेत. सध्या अशा वनव्यांना मोठ्या प्रमाणात सुरुवात झाली आहे. गवत जळल्याने गवतावर अवलंबुन असणार्या गुरे–ढोरांवर उपासमारीची वेळ येते. मोठ्या प्रमाणात सजीव सृष्टीचे नुकसान होते. या वणव्यांवर नियंत्रण आणणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच वनविभागाने हि बाब गंभीरतेने घेवून तत्काळ उपायोजना करणे आवश्यक आहे.

नैसर्गिक व कृत्रिम वणव्यांमुळे सजीव सृष्टी धोक्यात येते. पर्यावरणाची प्रचंड हानी होते. प्रदुषण वाढते. येथिल जैवविवीधता संपुष्टात येते. सरटणारे जीव, (घोरपड, साप, सरडे, विंचु इत्यादी) किटक आणि झाडे–झुडपे, औषधी वनस्पती आगीमध्ये भस्मसात होतात. फुलपाखरांना त्यांचे अन्न मिळविता येत नाही. विवीध प्राण्यांचे व पक्षांचे आसरे–निवारे संपुष्टात येतात. त्यांची पिल्ले देखिल या आगीत होरपळून मरतात. तसेच पक्षांचे आणि गुरे–ढोरांचे अन्न नष्ट झाल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ येते. दुर्गम भागात राहणार्या आदिवासींना देखिल या आगीमुळे धोका संभवतो. वणव्यांमुळे जिल्ह्यातील अनेक छोटे–मोठे गड–किल्लयांचे व ऐतिहासिक ठेव्यांचे बांधकाम कमकुवत होवुन ते ढासळण्याची भिती असते. किल्याच्या तटबंदीवर, बरुजांवर उगवलेले गवत जळाल्यामुळे त्यांचे नुकसान होते. वणवे लागल्यामूळे कल्ले व ऐतिहासिक वास्तूंवरील मोठ्या प्रमाणात वनसंपदा देखील नष्ट होत आहे. त्यामूळे येथे राहणार्या पशूपक्षांची अन्नपण्यासाठी खुप वाताहत होत आहे. येथे राहणारे मोर, माकड व भेकर हे प्राणी अन्न पाण्यासाठी दहिदिशा भटकतात. परिणामी या ठिकाणी वणवे लागणार नाहीत याची दक्षता व खबरदारी सर्वांनीच घेतली पाहिजे.